# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०६.०५.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपुर शहर, पोलीस उपायुक्त परि. क्र. २ अंतर्गत ०८ कुख्यात गुंड हद्दपार :-**

पोलीस ठाणे मानकापुर हददीतील गुन्हेगारी टोळीतील गुन्हेगार ईसम नामे १) शेख मोहसिन उर्फ बाबा उर्फ टायगर शेख मुसा, वय २७ वर्षे, रा. गल्ली नं. ८, ताज नगर, मानकापुर २) नितीन उर्फ बाल्या उर्फ मेंटल बंडु अंबादे, वय ४२ वर्षे, रा. इंदीरा माता नगर, फरस गेट, ह.मु.- झेंडा चौक जुनी वस्ती, मानकापुर ३) मो. जावेद उर्फ एमडी मो. शकील, वय २४ वर्षे, रा. गरीब नवाज मस्जीद जवळ, मानकापुर ४) आशिष लोकनारायण पांडे, वय ३४ वर्षे, रा. पेंशन नगर, पोलीस लाईन टाकळी मागे, नागपुर ५) अलमास उर्फ अम्मु अन्वर खान, वय २० वर्षे, रा. गल्ली नं. ९, ताज नगर, मानकापुर ६) ईम्रान उर्फ भांजा खान अकील खान, वय ३० वर्षे, रा. प्लॉट नं. ६८, ओम नगर, जरीपटका ७) अरबेज सय्यद उर्फ बाबा आशिक रसुल, वय ३६ वर्षे, रा. राजाराम नगर, चिचभवन, सोनेगांव ८) शेख सरफराज सक्कु फिरोज शेख, वय १९ वर्षे, रा. सरस्वती कॉलेज जवळ, कोराडी, नागपुर याचेविरूध्द नागपुर शहर हद्दीतील पोलीस ठाणे मानकापुर, गिट्टीखदान, अंबाझरी येथे दुखापत करणे, मारपिट करणे, अग्नीशस्त्रासह जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, दरोड्याची तयारी ईत्यादी गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी याकरीता, मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०२, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. ०१/२०२६, दिनांक ०५.०५.२०२६ अन्वये वरील सर्व गुन्हेगारांपैकी क्र. १, २ व ४ यांना ०६ महीने तसेच, क्र. ३, ५, ६, ७ व ८ यांना ०३ महीनेकरीता नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतुन हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद सर्व गुन्हेगारांचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यांनद झा पोलीस उपायुक्त (परि. क्र. २) यांच्या मार्गदर्शनाखाली, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे मानकापुर, गिट्टीखदान व अंबाझरी पोलीसांनी केली.

**२) अजनी पोलीसांची कामगिरी :- प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

मा. श्री. रविंद्रकुमार सिंघल पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनात संपुर्ण नागपुर शहरात मादक पदार्थ बाळगणारे व विक्री करणारे आरोपी विरोधात **"ऑपरेशन थंडर"** राबविण्यात येत आहे.

दिनांक ०६.०५.२०२५ चे २१.५० वा. चे सुमारास, अजनी पोलीसांचे पथक पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, अन्न सुरक्षा अधिकारी यांचेसह पोलीस ठाणे हद्दीत, प्लॉट नं. ८२, गजानन नगर, अभय नगर ग्राऊंड चे बाजुला, घाटे चे घरी किरायाने राहणारा आरोपी नामे जयकुमार घनशाम गुरबानी, वय ३८ वर्षे याचे राहते घरी रेड कार्यवाही केली असता, आरोपी हा त्याचे

ताब्यात शासनाने प्रतीबंधीत केलेली सुगंधीत तंबाखु व फ्लेवरचे तंबाखु पाऊच आणि वेगवेगळ्या कंपनीचा पानमसाला विक्री करीता बाळगुन मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन एकुण ३३२ कि. ग्रॅ. वजनी प्रतीबंधीत तंबाखु, पानमसाला किंमती ४,८२,६६८/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत केलेले तंबाखुजन्य पदार्थ व सुगंधीत पानमसाला बेकायदेशीर व अवैधरित्या विक्री करीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरूध्द फिर्यादी अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती शितल सुधाकर देशपांडे, वय ४२ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे आरोपीविरूध्द कलम १२३, २२३, २७४, २७५ भा.न्या.सं. सहकलम ५९ अन्न सुरक्षा मानके अधिनीयम—२००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. शिवाजीराव राठोड, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपुर शहर, मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीनचंद्र राजकुमार, पोनि. गुन्हे प्रभाकर कवाडे, पोउपनि. संतोष वाघमारे, अमोल गोंडे, पोहवा. प्रकाश गाडेकर, अतुल टिकले, राहुल शेंडे, पोअं. अविनाश चांगोले, विपीन पिल्लेवान, हिमांशु, अभिषेक, मपोअं. सविता व रेशमा यांनी केली.



**(गुन्हे)**

**२) पोलीस ठाणे अजनी :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी गोपाल जगन्नाथ चिमलवार, वय ८२ वर्षे, रा. प्लॉट नं. ११३, महात्मा फुले गार्डन जवळ, सुयोग नगर, अजनी, नागपूर हे सेवानिवृत्त असुन, पत्नीसोबत दोघेच राहतात. फिर्यादीचे घरी स्वयंपाक व घरकाम करण्यासाठी आरोपी क्र. १) श्रीमती नालंदा उर्फ अनिता अनिल जोसेफ, रा. प्लॉट नं. ७१, जयभीम नगर, गल्ली नं. १, बाबुळखेडा, अजनी, नागपुर ही येत होती. फिर्यादी हे त्यांचे पेन्शन खात्याचे चेक बुकवर सह्या करून घरीच ठेवत होते. सन २०२४ दिवाळीचे दरम्यान, फिर्यादी यांची प्रकृती खराब झाल्याने ते दवाखान्यात ॲडमिट होते. तेव्हा आरोपी ही फिर्यादीचे पत्नीसोबत राहत होती. दिनांक २६.०१.२०२४ ते दिनांक १०.०१.२०२६ चे दरम्यान, आरोपी क्र. १ हिने फिर्यादी यांचे पेन्शन खात्याचे चेक बुक मधील सह्या केलेले चेक चोरून तीचा साथीदार आरोपी क्र. २) राहुल गौरीशंकर शेंडे, रा. प्लॉट नं. ७१, जयभीम नगर, गल्ली नं. १, बाबुळखेडा, अजनी, नागपुर याचेसोबत संगणमत करून, आरोपी क्र. ३) श्रीमती मंगला हरीष कोहळे, रा. दृगधामना, शिवाजी चौक, जुनी वस्ती, वाडी, नागपुर हिचे खात्यामध्ये जमा करून, फिर्यादीचे पेन्शन खात्यातील रक्कम एकुण ७,००,०००/— रू. काढुन घेतले. आरोपींनी संगणमत करून, स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करून, त्यांची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि. आगासे ८४४६२८३९२५ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१८(४), ३३६(३), ३४०(२), ३(५) भा.न्या. सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे कळमणा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०५.०५.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे मधुकर सिताराम धकाते, वय ८१ वर्षे व मुलगा नामे नित्यांश, दोन्हीही रा. नाका नं. ४, जुना कामठी रोड, कळमना, नागपूर असे दोघे पोलीस ठाणे कळमना हद्दीतील घराजवळील दुकानात सामान आणनेकरिता पायदळ जात असता, संकेत पान मंदीर समोर कळमनाकडुन कामठीकडे जाणाऱ्या एका अज्ञात ऑटोरिक्षा चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, फिर्यादीचे वडीलांना धडक देवुन पळुन गेला. अपघातात फियादीचे वडील गंभीर जखमी व मुलगा नित्यांश हा किरकोळ जखमी झाला. फिर्यादीचे वडीलांना उपचाराकरीता सिटी हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. मुलगा नित्यांश याचा उपचार करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादी कमलेश मधुकर धकाते, वय ३३ वर्षे,यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. राऊत ९७२०७३७४५२ यांनी आरोपीविरूध्द कलम २८१, १०६(१), १२५(अ) भा.न्या. सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे हिंगणा</u> :—** दिनांक ०५.०५.२०२६ चे १२.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, सुमठाना गावाजवळील मोकळ्या जागेवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५५ ते ६० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन— रंग काळा सावळा, बांधा सडपातळ, उंची ५ फुट २ इंच, अंगात निळ्या लाल रंगाचे पट्टे असलेला फुलबाहीचा शर्ट व राखाडी रंगाचा फुलपॅन्ट घातलेला आहे. मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे हिंगणा येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त सुचनेवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे मपोउपनि. चव्हाण यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :—** कु. सलोनी चंदु आजने, वय २१ वर्षे, रा. प्लॉट नं. ३८, जुना सुभेदार ले—आऊट, बॅक कॉलोनी, हुडकेश्वर, नागपूर ही दिनांक ०३.०५.२०२६ चे १६.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे लांब, अंगात— पिवळ्या रंगाची टि—शर्ट व काळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेले असुन, सोबत काळ्या रंगाची ट्रॉलीबॅग व निळ्या रंगाची हॅण्डबॅग आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**<u>२) पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :—** कु. राजनंदीनी पृथ्वीराज हेमणे, वय १६ वर्षे, रा. प्लॉट नं. २१, न्यु प्रेरणा नगर, हुडकेश्वर, नागपूर ही दिनांक २५.०४.२०२६ चे २०.०५ वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून

आली नाही. <u>**वर्णन**</u> रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे लांब, अंगात— जांभळ्या रंगाची शर्ट व काळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.



सलोनी



राजनंदीनी

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**